# ख्रिस्ती लोकांचे ओळखपत्र

(डॉ. रंजन केळकर)

आपण कोण आहोत, कोठून आलो आहोत आणि कोठे जाणार आहोत, हे तीन प्रश्न मानवापुढे अगदी प्राचीन काळापासून पुन्हा पुन्हा उभे राहिले आहेत. फक्त विचारवंत व्यक्तींनाच नाही, तर संस्थांना, समाजांना आणि देशांनादेखील ह्या तीन मूलभूत मानवी प्रश्नांचा सामना वेळोवेळी करावा लागला आहे, पण त्यांची समाधानकारक उत्तरे क्वचितच कोणाला सापडली असावीत.

हल्लीच्या काळात मात्र, “मी कोण आहे?” ह्या प्रश्नाचे उत्तर केवळ उच्च वैचारिक पातळीवर नाही, तर रोजच्या सामान्य व्यवहारात मला अनेकदा द्यावे लागत आहे. निवडणुकीत माझे मत नोंदवायला, बँकेत खाते उघडायला, मोबाईल विकत घ्यायला, गाडीसाठी कर्ज काढायला, रेल्वेचे आरक्षण करायला, मी कोठेही काहीही करायला गेलो, तरी मला “मी कोण आहे?” ह्याचा दाखला सादर करावा लागतो. माझे ओळखपत्र बरोबर असल्याशिवाय मला सरकारी कार्यालयात, दवाखान्यात, विमानतळावर, कोठेही प्रवेश मिळत नाही. माझा फोटो, माझे नाव, माझी जन्मतारीख, माझा पत्ता, माझी स्वाक्षरी, हे सर्व दाखवणारे ओळखपत्र मला सतत बरोबर बाळगावे लागते.

## ख्रिस्ती समाज – पूर्वीचा आणि आताचा

मध्यंतरी एका समितीत, जिचा मी एक सदस्य आहे, “अख्रिस्ती” व “ख्रिस्तीतर” ह्या दोन शब्दांत काय फरक आहे ह्यावर चर्चा झाली होती. मी माझे मत मांडले की, ज्याचा धर्म ख्रिस्ती नाही तो ख्रिस्तीतर, आणि जो धर्माने ख्रिस्ती असला तरी ज्याची वागणूक ख्रिस्ती धर्मानुसार नाही तो अख्रिस्ती. ह्यावर दुसरा प्रश्न हा उपस्थित होतो की, मग “ख्रिस्ती” कोणायला म्हणायचे, ख्रिस्ती लोकांचे ओळखपत्र काय आहे?

हा वाद असाच पुढे चालू ठेवला तर आणखी अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. “ख्रिस्ती” समाज भारतातील इतर समाजांपेक्षा कसा निराळा आहे, “ख्रिस्ती” संस्थांची कार्यपद्धती इतर संस्थांहून कशी वेगळी आहे, “ख्रिस्ती” सेवेची वैशिष्ट्ये काय आहेत, “ख्रिस्ती” लेखक, डॉक्टर, नर्सेस, प्रशासक, उद्योगपती, ह्यांचा काही वेगळा दृष्टिकोण आहे का, वगैरे.

मागच्या पन्नास-साठ वर्षांत, म्हणजे मी लहान होतो तेव्हापासून आतापर्यंत आपल्या जगात आणि जीवनात खूप काही बदललेले मी स्वतः पाहिले आणि अनुभवले आहे. एक छोटे उदाहरण द्यायचे झाले तर १९६० च्या आसपास, जेव्हा माझे वडील, रत्नाकर हरी केळकर, ज्ञानोदय

मासिकाचे संपादक होते, तेव्हा ज्ञानोदयात “ख्रिस्ती गृह” नावाचा एक विभाग असायचा. एवढे त्या काळच्या ख्रिस्ती समाजात कुटुंबसंस्थेला महत्व दिले जात असे, तेव्हाच्या “ख्रिस्ती गृहात” नियमितपणे रात्रीची कौटुंबिक प्रार्थना व्हायची, मुलांना शास्त्रभाग पाठ करावे लागत, त्यांना उपासनासंगीतातील गाणी शिकावी लागत. आईबाप मुलांच्या संगोपनासाठी, त्यांना चांगल्या सवयी लावण्यासाठी, आपल्या कामातून वेळ काढत असत. कुटुंबांचे आपले नियम असत आणि ते सगळ्यांना पाळावे लागत. आजच्या “ख्रिस्ती गृहाची” अशी काही ओळख राहिली आहे का?

एके काळी ख्रिस्ती शाळा, कॉलेजे, आणि दवाखाने ह्या पथदर्शक संस्था होत्या. खरोखर, त्यांचे कार्य पाहून, त्यांच्या सेवाभावाने प्रेरित होऊन, इतर धर्मांतील समाजसुधारकांनी अशा प्रकारच्या संस्था उभारल्या. पण पन्नास वर्षांपूर्वी आपल्या त्या पथदर्शक ख्रिस्ती संस्था स्वतः मात्र जशा होत्या तशाच राहिल्या किंवा मोडकळीस आल्या. मी ज्या ख्रिस्ती शाळेत काही काळ शिकलो ती एका बंगल्यात भरायची. अजून ती शाळा त्याच जुन्या बंगल्यात भरते. पण माझ्या शाळेच्या आवती भोवती मात्र किती तरी दुसऱ्या शाळांच्या भव्य इमारती आज उभ्या असलेल्या मी पाहतो. काही अपवाद वगळता, हीच गत बहुतेक ख्रिस्ती कॉलेज, दवाखाने, वगैरेंची झालेली आहे.

ख्रिस्ती लोक जनसेवा करतात ती प्रभूसेवा समजून करतात असे आपण भूतकाळात म्हणत असू, आणि तेही काहीशा अभिमानानेच. पण तेच आजच्या काळात म्हणण्यासारखी परिस्थिती राहिलेली नाही. आपल्यापेक्षा अतिशय चांगल्या दर्जाची सेवा “ख्रिस्तीतर” लोक आणि संस्था करत असल्याचे आपण आपल्या सभोवती पाहत आहोत.

## तरुण पिढीची जबाबदारी

मागच्या पन्नास-साठ वर्षांच्या ख्रिस्ती समाजाच्या इतिहासात जायचा माझा येथे हेतू नाही. हे सर्व असे का आणि कसे घडले हे आपल्यापैकी अनेकांना माहीत आहे आणि त्याचे येथे विश्लेषण करण्याचा माझा उद्देश नाही. मी हा लेख त्या ख्रिस्ती तरुणांना उद्देशून लिहीत आहे ज्यांना हा इतिहास माहीत नसेल किंवा त्यात त्यांना रुची नसेल. पण पुढील पन्नास वर्षांनंतर भारतीय ख्रिस्ती व्यक्तींची, समाजाची आणि संस्थांची काय ओळख राहणार आहे ह्याविषयी आपण आताच विचार केला पाहिजे आणि तो तरुणांनी केला पाहिजे असे मला वाटते, भविष्यातील परिस्थिती आणखी बिकट होऊ नये म्हणून आताच पावले उचलली पाहिजेत आणि आपल्याला कोणत्या दिशेने वाटचाल केली पाहिजे हे आताच ठरवले पाहिजे. ह्यावर सखोलपणे आणि प्रार्थनापूर्वक करण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीची आहे असे मला मनापासून वाटते.

## ख्रिस्ती सेवा

'तुम्ही लहानांतल्या लहानासाठी जे काही केले ते तुम्ही माझ्यासाठी केले' ह्या प्रभू येशूच्या सांगण्यानुसार आपल्या ख्रिस्ती सेवेचे मोजमाप केले जाईल. एखाद्या तहान लागलेल्या माणसाला आपण गार पाणी दिले तरी ती ख्रिस्ती सेवा झाली. ख्रिस्ती सेवा ही जगजाहीर केली जात नाही. ती इतकी गुप्तपणे करायची असते की, उजव्या हाताने काय केले हे डाव्या हाताला कळू नये. ख्रिस्ती सेवेच्या मुळाशी निःस्वार्थ ख्रिस्ती प्रीती असली पाहिजे.

ख्रिस्ती शैक्षणिक संस्थांच्या रस्त्यावरच्या भिंतींवर बायबलमधली वचने रंगवलेली असतात. ख्रिस्ती हॉस्पिटलमध्ये दाखल होणाऱ्या अत्यवस्थ रुग्णालासुद्धा 'अहो सर्व कष्टी लोकांनो, माझ्याकडे या,' ह्यासारखी वचने लिहिली असलेल्या कमानींखालूनच जावे लागते. ख्रिस्ती सेवा, मग ती शैक्षणिक असो अथवा वैद्यकीय असो, तिच्यात 'टर्म्स ॲण्ड कंडिशन्स ॲप्लाय' असे असू नये. लोकांच्या परिस्थितीचा किंवा गरजेचा फायदा घेऊन त्यांना सुवार्ता सांगण्याचा आपल्याला कोणीही हक्क दिलेला नाही. उलट आपण जे काही करतो, त्यात प्रीती नसली तर त्याचा काहीच उपयोग नाही हे संत पौलाने अगदी स्पष्ट केले आहे.

ह्याशिवाय, आपण एका निधर्मी राज्यप्रणालीत राहत आहोत. आपण शालेय विद्यार्थ्यांकडून प्रभूची प्रार्थना वदवून घेऊ शकत नाही. हॉस्पिटलमधील रुग्णासाठी आपण जबरदस्तीने प्रार्थना करू शकत नाही. कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या लोकांना आपण ट्रॅक्ट वाटू शकत नाही. सेवा करता करता सुवार्ताप्रसार करण्याचे युग आता संपले आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. पण ह्याचा अर्थ असा नाही की, 'सर्व जगाला सुवार्तेची घोषणा करा' ही प्रभूची आज्ञा विसरून जायची. ख्रिस्ती व्यक्तित्वातून प्रीती भरून वाहिली पाहिजे आणि ती लोकांना दिसली पाहिजे. तीच आपली सुवार्तेची घोषणा. संत पौल म्हणाला तसे, 'मी जगतो असे नाही तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो', हे आपले ब्रीद असले पाहिजे.

## ख्रिस्ती जीवन

आपल्याला ख्रिस्तासारखे व्हायचे असेल तर ख्रिस्त कसा होता हे आपल्याला आधी पूर्णपणे माहीत असले पाहिजे. पण ख्रिस्त जसा दिसायचा तसे दिसण्याचा प्रयत्न करायची आपल्याला गरज नाही. तो कसा दिसायचा ह्याचे वर्णन नव्या करारात आढळतसुद्धा नाही. ख्रिस्त आपल्या अंतरंगातून प्रकट झाला पाहिजे. ख्रिस्ती धर्म हा अंतःकरणाचा धर्म आहे. प्रभू येशूने अगदी कडक शब्दांत सांगितले की, जशी थडगी बाहेरून सुंदर दिसतात पण आतून घाणीने भरलेली असतात तसे आपण होऊ नये.

परमेश्वर स्वतः आपले बाह्यरूप पाहत नाही तर अंतरंग पाहत असतो. स्तोत्रकर्ता म्हणतो की, परमेश्वराला यज्ञ आणि बली नको आहेत, त्याला हवे आहे ते भग्न हृदय आणि अनुतप्त आत्मा. म्हणूनच स्तोत्रकर्ता परमेश्वराला विनंती करतो की, त्याने त्याला शुद्ध हृदय आणि स्थिर आत्मा द्यावा. ही प्रार्थना प्रत्येक ख्रिस्ती माणसाची प्रार्थना असायला हवी. ख्रिस्त खरोखर आपल्या अंतःकरणात राहतो हे लोकांना दिसले पाहिजे आणि तीच आपली खरी ओळख बनली पाहिजे.

प्रभू येशूने स्पष्ट केले की, आपण एकमेकांवर प्रीती केली पाहिजे, म्हणजे त्यावरून सगळे लोक ओळखतील की, आपण त्याचे शिष्य आहोत. आणि त्याने हेही सांगितले की, त्याला 'प्रभू, प्रभू,' म्हणणारे सर्व जण स्वर्गाच्या राज्यात जातीलच असे नाही पण जे त्याच्या पित्याच्या इच्छेप्रमाणे करतील तेच जातील.

म्हणून ख्रिस्ती जीवनात, ख्रिस्ती सेवेत, आपण ख्रिस्ताला अग्रक्रम दिला पाहिजे. प्रत्येक कामात ख्रिस्ताला आपल्या पुढे स्थान दिले पाहिजे. संत पौल म्हणाला की, आपण जे काही करतो, ते प्रभू येशूच्या नावाने करायला हवे. आजची आय. टी. ची पिढी सॉफ्टवेअर-हार्डवेअरची भाषा बोलते. कोणाला प्रेझेंटेशन करायचे आहे, कोणाची डेडलाइन आहे. तेथे येशूला मध्ये आणता येईल का? पण बायबल सांगते की, ज्यात येशूचे प्राविण्य नाही असे कोणतेही क्षेत्र नाही. कोणत्याही कामात, कोणत्याही विषयात, आपण प्रभू येशूचे मार्गदर्शन मागू शकतो आणि ते मिळते. संत पौल म्हणतो की, सर्व ज्ञानीणाचे आणि ज्ञानाचे निधी ख्रिस्तामध्ये लपलेले आहेत. देवाच्या सुज्ञतेच्या व ज्ञानाच्या धनाची खोली आपल्या कल्पनेच्या पलीकडची आहे. आपण मागितले तर त्या निधीतून आपल्याला अवश्य मिळेल.

## भविष्यकाळासाठी तयारी

ख्रिस्ती धर्म काय आहे, त्याची मूलतत्त्वे काय आहेत, आपला विश्वास काय आहे, हे आपण स्वतः जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्यालाच जर हे माहीत नसेल तर दुसऱ्यांना आपण कसे समजावून सांगणार? हल्ली अशी परिस्थिती आहे की, चर्चमध्ये शास्त्रभाग वाचायच्या वेळी पृष्ठ क्रमांक सांगावा लागतो नाहीतर लोकांना तो शोधता येत नाही. म्हणून पवित्र शास्त्राचे नियमित वाचन आणि त्यावर रात्रंदिवस मनन चिंतन हे ख्रिस्ती माणसाने एक अनिवार्य कर्तव्य मानले पाहिजे.

आजच्या तरुण पिढीकडे पैशांची, साधनांची, बुद्धिमत्तेची, कौशल्यांची, कमी नाही. परदेशी मिशनऱ्यांची आणि परदेशी पैशाची आता ख्रिस्ती समाजाला गरज राहिलेली नाही. आजचे तरुण चर्चसाठी भरपूर पैसा देण्यासही तयार आहेत. पण त्या पैशाचे पुढे काय होते हे त्यांनी चर्चला

विचारणे जरुरी आहे. आपल्या चर्चमध्ये, समाजामध्ये काय होत आहे ह्याविषयी तटस्थाची भूमिका घेऊन, उदासीन राहून, 'जे होत आहे ते होऊ द्या,' 'आम्हाला वेळ नाही,' 'आम्हाला त्याचे काय,' असे म्हणून चालणार नाही. आजच्या तरुणांनी स्वतःला, कुटुंबाला, समाजाला ख्रिस्तात रुजविण्याचा आणि बळकट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या व इतरांच्या भविष्यकाळासाठी, भारतात ख्रिस्ती समाजाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी, हे अत्यंत आवश्यक आहे.

आपल्या धर्माची मूल्ये इतर धर्मांहून निराळी आहेत हे दाखवून द्यायचे असेल, आपल्या प्रभूने दिलेल्या आज्ञांचे पालन करीत राहायचे असेल, आणि ख्रिस्ताची ओळख अधिकाधिक लोकांना करून द्यायची असेल, तर त्यासाठी आतापासूनच प्रयत्न केले पाहिजेत आणि ते तरुणांनी केले पाहिजेत.

**येशू ख्रिस्ताने त्याच्या एका मंडळीला लिहिलेले पत्र**

संत योहानाला प्रभू येशूने केलेल्या प्रकटीकरणात त्याने त्याच्या सात मंडळ्यांना सात निरनिराळी पत्रे लिहायला सांगितले होते. त्या प्रत्येक पत्राच्या सुरुवातीस प्रभूने त्या-त्या मंडळीच्या सद्गुणांचे वर्णन केले आहे पण नंतर त्या प्रत्येकीत काही तरी कमी असल्याचे दाखवून दिले आहे. लावदिकिया येथील मंडळीला लिहिलेल्या पत्रावर आपण अवश्य विचार केला पाहिजेः

"आणि लावदिकियाच्या मंडळीच्या देवदूताला लिहीः जो आमेन, जो विश्वासू आणि खरा साक्षी, जो देवाच्या उत्पत्तीचा उगम आहे तो हे म्हणतोः मी तुझी कामे जाणतो; तू थंड नाहीस किंवा गरम नाहीस; ... पण तू कोमट आहेस, ... तू म्हणतेस, 'मी सधन आहे, आणि संपन्न झाले आहे; आणि मला कशाची गरज नाही.' पण तू कष्टी, लाचार आणि दरिद्री, अंधळी आणि उघडी आहेस हे तू जाणत नाहीस. ... मी जितक्यांवर प्रीती करतो तितक्यांना मी दोष लावतो आणि शासन करतो; म्हणून ईर्ष्या धर आणि पश्चात्ताप कर. ... बघ, मी दाराशी उभा आहे आणि ठोकीत आहे. कोणी मनुष्य जर माझा आवाज ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याकडे आत येईन आणि त्याच्याबरोबर जेवीन, आणि तो माझ्याबरोबर जेवील. ... जसा मी स्वतः विजय मिळवला, आणि मला माझ्या पित्याच्या राजासनावर त्याच्याबरोबर बसविले आहे, तसा जो विजय मिळवील त्याला मी माझ्या राजानसावर माझ्याबरोबर बसू देईन. ... आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला कान आहे तो ऐको."

ह्या पत्राचा बराचसा भाग आपल्या आजच्या ख्रिस्ती मंडळीला व समाजाला लागू आहे. ह्या पत्रात प्रभूने आधी मंडळीची प्रशंसा केली आहे, मग टीका केली आहे, समोर संधी उभी केली आहे, आमंत्रण दिले आहे, आशा दाखवली आहे, आणि शेवटी मिळणाऱ्या विजयाचे आश्वासन दिले आहे.